**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

**दिनांक – १३/०९/२०२१** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १३**/०९/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
**२. मा.दर्शले रेखा राजेश - सदरस्य**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने शुक्र**वार** दिनांक **१७/०९/२०२१** रोजी दुपारी **२.५०** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

**( दिनांक १३/०९/२०२१ ची तहकूब सभा )**

**दिनांक – १७/०९/२०२१** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक १३/०९/२०२१ रोजीची तहकूब सभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.**

**१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सदस्य
३. मा.अपर्णा निलेश डोके - सदस्य
४. मा.भालेकर प्रविण महादेव - सदस्य
५. मा.दर्शले रेखा राजेश - सदस्य

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.सुषमा शिंदे – सहा.आयुक्त, मा.रज्जाक पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक -४२ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १७/०९/२०२१

सुचक :- मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ - मा.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३११/२०२१ दि.३१/०८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रभाग क्र२० संत तुकारामनगर येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतीक भवन पुरूष व्यायामशाळा संत तुकाराम्नगर ही जयभारत मित्र मंडळ संत तुकारामनगर या संस्थेस मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६९७७

दि.११/०३/२०२० अन्वये मा अतिरिक्त आयुक्त (३) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/१८४/२०२० दि.२९/१०/२०२० अन्वये दि.०७/०८/२०२० ते दिनांक ०६/०६/२०२१ या कालावधी करिता ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यात आली होती. सदर व्यायामशाळेची करारानाम्याची मुदत दि.०६/०६/२०२१ रोजी संपली आहे. जय भारत मित्र मंडळ संत तुकारामनगर यांची दि.०९/०७/२०२१ ची मागणी व संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक ह क्षेत्रीय कार्यालय यांच्या कडील दिनांक ११/०८/२०२१ च्या अहवालानुसार व मनपाचे क्रीडा धोरणानुसार प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतीक भवन पुरूष व्यायामशाळा संत तुकारामनगर ही जय भारत मित्र मंडळ संत तुकारामनगर या संस्थेस आदेशाच्या तारखेपासून दरमहा र.रु.२०००/- म.न.पा कडून देवून ११ महिने कराराने व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

---------

**( उत्तम प्रकाश केंदळे)**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४४४/२०२१
दिनांक : २१//०९/२०२१

**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.